नरक चतुर्दशी च्या
हार्दिक शुभेच्छा

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

अभ्यंगस्नानाच्या
मंगल पर्वावर आपल्या
जीवनातील दुःख, संकटे आणि
नकारात्मकता दूर होवोत.
सुख, समृद्धी, आरोग्य आणि
आनंदाची दिवाळी आपल्या
सर्वांच्या आयुष्यात उजळो!

॥लक्ष्मीपूजन॥

• वर्ष : ०४ • अंक : ०५८ • पुणे • रविवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

३८ हजार पणत्यांच्या तेजाने

शनिवारवाडा उजळला!

‘वन्दे मातरम्’च्या जयघोषात पुण्याची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये ऐतिहासिक नोंद

५० वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान; देशभक्ती, राष्ट्राभिमान आणि सैन्यदलाप्रती कृतज्ञतेचा अनोखा सोहळा





पुणे (दै. आरंभ पर्व)

देशभक्तीचा उत्साह, राष्ट्रप्रेमाची भावना आणि भारतीय सैन्यदलाप्रती कृतज्ञतेचा अनोखा संगम शनिवारी ऐतिहासिक शनिवारवाड्यात अनुभवायला मिळाला. ‘वन्दे मातरम्’च्या सार्धशताब्दी वर्षानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित भव्य दीपप्रज्वलन सोहळ्यात तब्बल ३८ हजार २३३ पणत्या एकाच वेळी प्रज्वलित करून पुणे शहराने जागतिक विक्रमाला गवसणी घातली. या विक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद झाली असून, पुण्याच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे.

‘सन्मान राष्ट्रगीताचा, अभिमान पुणेकरांचा!’ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने देशभक्ती, राष्ट्रीय अस्मिता आणि भारतीय सैन्यदलाच्या शौर्याप्रती कृतज्ञतेचा संदेश जगभर पोहोचवला.

या ऐतिहासिक सोहळ्याचे उद्घाटन पुण्याच्या महापौर सौ. मंजुषा नागपुरे, पुणे महानगरपालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम, केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार श्री. मुरलीधर मोहोळ आणि ब्रिगेडियर तरुणेश यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यानंतर अभिनव विद्यालयाच्या अकरा विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ‘वन्दे मातरम्’च्या भावपूर्ण गायनाने संपूर्ण शनिवारवाडा देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. महापौर मंजुषा नागपुरे यांनी प्रास्ताविकातून या उपक्रमामागील संकल्पना आणि उद्देश स्पष्ट केला. यावेळी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, तसेच नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण आणि अल्पसंख्याक विकास मंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात भारतीय सैन्यदलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये ब्रिगेडियर तरुणेश (डेप्युटी जीओसी), कर्नल विकास सावळजे (एसएसओ, कॅन्टोन्मेंट) आणि कर्नल श्रीनिवास सातवळेकर (कर्नल व्हेटरन्स) यांचा समावेश होता. उपस्थित आमदारांचा महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यातील सर्वाधिक भावस्पर्शी क्षण म्हणजे देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या ५० वीरमाता आणि वीरपत्नींचा विशेष सन्मान. आपल्या कुटुंबातील वीरांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी केलेल्या सर्वोच्च त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा गौरव करण्यात आला. या सन्मानाने उपस्थितांच्या डोळ्यांत अभिमानासोबतच भावनाही दाटून आल्या.

कर्नल राजेशकुमार जिंदाल यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्रसेवेचे महत्त्व आणि देशाच्या सुरक्षेसाठी भारतीय सैन्यदल देत असलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर ब्रिगेडियर तरुणेश, मंत्री माधुरी मिसाळ, मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी उपस्थितांना संबोधित केले. ‘वन्दे मातरम्’चा गौरवशाली इतिहास, राष्ट्रभक्तीचे महत्त्व आणि भारतीय सैन्यदलाचे अतुलनीय योगदान यांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

या विक्रमी उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे वरिष्ठ अधिकृत परीक्षक स्वप्नील डांगरीकर यांनी प्रत्यक्ष पडताळणी आणि परीक्षण केले. त्यानंतर त्यांनी या उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद झाल्याची घोषणा केली. या ऐतिहासिक यशाचे अधिकृत प्रमाणपत्र महापौर मंजुषा नागपुरे आणि महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्वीकारले. या घोषणेनंतर उपस्थितांनी जल्लोषात आनंद व्यक्त केला.

या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रजीत नायर, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, विद्युत विभागाचे मुख्य अभियंता शेकटकर, सांस्कृतिक उपायुक्त टेंगळे, नगरसचिव योगिता भोसले, भवन रचना विभागाचे मुख्य अभियंता बिपीन शिंदे, सर्व नगरसेवक-नगरसेविका आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिकपणे राष्ट्रगीत ‘जन गण मन’ सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कर्नल रवि आणि वसुंधरा काशीकर यांनी केले.

३८ हजार २३३ पणत्यांचा प्रकाश, ५० वीरमाता-वीरपत्नींचा सन्मान आणि ‘वन्दे मातरम्’चा दुमदुमलेला जयघोष! या अविस्मरणीय सोहळ्याच्या माध्यमातून पुणे महानगरपालिकेने केवळ जागतिक विक्रमाची नोंद केली नाही, तर देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय सैन्यदलाप्रती कृतज्ञतेचा एक प्रेरणादायी आदर्शही देशासमोर ठेवला. ऐतिहासिक शनिवारवाड्याच्या साक्षीने घडलेला हा सुवर्णक्षण पुण्याच्या इतिहासात अभिमानाने नोंदवला जाणार आहे.

३८ हजार २३३ पणत्यांनी शनिवारवाडा उजळला!

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे ३८ हजार २३३ पणत्यांचे एकाच वेळी करण्यात आलेले भव्य दीपप्रज्वलन. लष्करी बँडच्या देशभक्तिपर सुरांनी वातावरणात उत्साह निर्माण केला होता. नियोजनबद्ध पद्धतीने सहभागींच्या माध्यमातून हजारो पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या आणि अवघा शनिवारवाडा दीपप्रकाशाने उजळून निघाला. ऐतिहासिक वास्तूच्या परिसरात निर्माण झालेले हे मनोहारी दृश्य पुणेकरांसाठी अविस्मरणीय ठरले.

सण दिवाळीचा, थरार भारत-पाकिस्तानचा!

रविवारी रंगणार हायव्होल्टेज सामना

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज सामना दिवाळीत रंगणार आहे. रविवार, 8 नोव्हेंबर रोजी क्रिकेट चाहत्यांना या महामुकाबल्याचा थरार अनुभवता येणार आहे. विशेष म्हणजे, हा सामना 2026 अंडर-19 आशिया कप स्पर्धेचा भाग आहे. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानच्या युवा संघांमधील ही लढत पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. चला तर मग, जाणून घेऊया या सामन्याची वेळ, ठिकाण आणि थेट प्रक्षेपणासंदर्भातील संपूर्ण माहिती. भारतीय संघाचा हा स्पर्धेतील दुसरा सामना असेल. यापूर्वी टीम इंडियाने नेपाळविरुद्धच्या पहिल्या सामन्यात 10 विकेट्सने दणदणीत विजय मिळवला होता. या विजयासह भारतीय संघाने 'अ' गटात अव्वल स्थान पटकावले आहे. दुसरीकडे, पाकिस्ताननेही आपल्या पहिल्या



सामन्यात यूएईचा 9 विकेट्सने पराभव केला होता. त्यामुळे दोन्ही संघ विजयी लय कायम राखण्यासाठी मैदानात उतरतील.

2026 अंडर-19 आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रविवार, 8 नोव्हेंबर रोजी खेळवला जाणार आहे. हा सामना एकदिवसीय (ODI) स्वरूपाचा असेल. भारतीय वेळेनुसार सकाळी 10 वाजून 30 मिनिटांनी सामन्याला सुरुवात होईल. भारत आणि पाकिस्तानच्या 19 वर्षांखालील संघांमधील हा सामना अल अमेरत क्रिकेट मैदानावर (मिनिस्ट्री टर्फ-2) खेळवला जाणार आहे.

भारतामध्ये या सामन्याचे थेट प्रक्षेपण सोनी स्पोर्ट्स नेटवर्कच्या वाहिन्यांवर पाहता येणार आहे. त्यामुळे टीव्हीवर क्रिकेटचा आनंद घेणाऱ्या चाहत्यांना हा सामना थेट पाहता येईल. भारत-पाकिस्तान सामन्याचे थेट प्रक्षेपण सोनी लिव्ह (SonyLIV) ॲप आणि वेबसाइटवर उपलब्ध असेल. त्यामुळे क्रिकेट चाहते मोबाईल, लॅपटॉप तसेच स्मार्ट टीव्हीवर या सामन्याचा आनंद घेऊ शकतील.

भारताचा संघ : लक्ष्य राजेश रायचंदानी (कर्णधार), आर्यवीर सेहवाग, अन्वय द्रविड (यष्टीरक्षक), अर्जुन राजपूत, इशान सूद, काव्या पटेल, मनाल चौहान, मोहित उलवा, यशवीर गौर, व्हीके विनीत, यशवर्धन चौहान, रजत बघेल, शविन विनोद, आर्यन सावसानी, कुशाग्र ओझा.

पाकिस्तानचा संघ : उस्मान खान, जहांगीर बिलाल, अब्दुल कादिर, अहमद हुसैन, अली रझा, हमजा जहूर (यष्टीरक्षक), हसनैन अब्बास दार, मोहम्मद सय्यम, फरहान युसूफ (कर्णधार), नकाब शफीक, रिझवानुल्ला, हुजैफा अहसान, अब्दुल सुभान, मोहम्मद हुजैफा, हायम खान.

‘गोकुळ’वरून कोल्हापुरात राजकीय धुरळा

सतेज पाटील फेक नरेटिव्ह सेट करण्यात तरबेज : धनंजय महाडिक

कोल्हापूर (दै. आरंभ पर्व)

गोकुळ दूध संघातील शासननियुक्त तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्तीवरून कोल्हापूरमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या निर्णयाविरोधात दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार धनंजय महाडिक यांनी काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांच्यावर जोरदार टीका केली आहे. माजी पालकमंत्र्यांचा इतिहास कोल्हापूरकरांना माहिती आहे. त्यांनी यापूर्वी अनेकदा केलेला उन्माद लोकांनी पाहिला आहे. त्यामुळे उद्याच्या मोर्चाला नेमके किती लोक उपस्थित राहतील, याबाबत आपल्याला शंका असल्याचे महाडिक यांनी म्हटले आहे.

गोकुळ दूध संघावर शासनाचा कब्जा करण्याचा कोणताही प्रयत्न नसल्याचे स्पष्ट करत महाराष्ट्र सरकार गोकुळच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचेही त्यांनी सांगितले. गोकुळचा कारभार सुरळीत चालावा आणि हा सहकारी दूध संघ अधिक नावारूपाला यावा, यासाठी सरकार आणि महायुती सकारात्मक भूमिका घेत असल्याचा



दावा त्यांनी केला. तज्ज्ञ संचालक नियुक्त करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही मानले.

गोकुळच्या सत्तेवरून सुरू असलेल्या वादावर बोलताना महाडिक म्हणाले की, गोकुळमध्ये सत्ता वाटून घेण्याबाबत किंवा एकत्रितपणे कारभार करण्याबाबत सकारात्मक प्रस्ताव आला असता, तर त्यावर निश्चित विचार केला असता. चेअरमनपदाची जबाबदारी काही वर्षे एका गटाकडे आणि उर्वरित काळ दुसऱ्या गटाकडे देण्याबाबत चर्चा झाली असती, तरी त्यातून मार्ग काढता आला असता. मात्र, अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव देण्याऐवजी केवळ तांत्रिक मुद्द्यांवरून आपल्याला अडवले जात असल्याचा आरोप करण्यात आला. सतेज पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रात चुकीचा संदेश पसरवला असून, बहुमत आमच्याकडे असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, गोकुळमध्ये कोरम पूर्ण करण्यासाठी अद्याप एक जागा कमी असल्याचे महाडिक यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वांचीच समन्वयाची भूमिका होती. आम्ही विरोधात बसणार असल्याचेही आधीच स्पष्ट केले होते. असे असताना विरोधकांकडून वेगळे चित्र निर्माण केले जात असल्याची टीका त्यांनी केली. फेक नरेटिव्ह तयार करण्यात सतेज पाटील तरबेज असल्याचा टोलाही त्यांनी लगावला. गोकुळच्या मालकी हक्कावर आणि भविष्यातील कारभारावरून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांदरम्यान महाडिक यांनी सतेज पाटील यांच्यावर आणखी एक गंभीर टीका केली. गोकुळ दूध संघाचे नाव बदलून तो डी. वाय. पाटील दूध संघ होण्यापासून ठरावधारकांनी वाचवला, असा दावा त्यांनी केला. संबंधितांनी सहकारी साखर कारखान्याचे काय केले, हे सर्वांना माहिती आहे, असे म्हणत त्यांनी सतेज पाटील यांना लक्ष्य केले.

लक्ष्मीपूजन : श्रद्धा, भक्ती आणि समृद्धीचा मंगलमय उत्सव!

दीपावली हा भारतीय संस्कृतीतील आनंद, उत्साह, मांगल्य आणि प्रकाशाचा महापर्व आहे. दीपावलीतील सर्वांत महत्त्वाचा आणि श्रद्धेचा दिवस म्हणजे श्री लक्ष्मीपूजन. या दिवशी धन, धान्य, ऐश्वर्य, वैभव आणि समृद्धीची अधिष्ठात्री देवी महालक्ष्मीचे पूजन करून प्रत्येक कुटुंब सुख, शांती आणि भरभराटीची कामना करते. घराघरांत दिव्यांची आरास, सुंदर रांगोळ्या, फुलांची सजावट आणि भक्तिमय वातावरण निर्माण होते. सर्वत्र आनंद आणि चैतन्याचे वातावरण पाहायला मिळते.

हिंदू धर्मपरंपरेनुसार लक्ष्मीपूजनाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. देवी महालक्ष्मी ही संपत्ती, सौभाग्य, वैभव आणि मंगलतेचे प्रतीक मानली जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी भगवान श्री गणेश आणि देवी महालक्ष्मी यांची विधिवत पूजा केली जाते. गणेशाला प्रथम पूजनीय मानले जाते, तर महालक्ष्मीच्या कृपेने घरात धनधान्य आणि सुखसमृद्धी नांदते, अशी श्रद्धा आहे.

पूजेची तयारी आणि मंगलमय वातावरण

लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने घराची स्वच्छता



करून घराचा प्रत्येक कोपरा सजविला जातो. प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी, फुलांचे तोरण आणि पणत्यांची सजावट केली जाते. सायंकाळी शुभ मुहूर्तावर देवी महालक्ष्मी आणि श्री गणेशाची स्थापना करून हळद, कुंकू, अक्षता, फुले, हार, धूप, दीप, नैवेद्य आणि मिठाई अर्पण केली जाते. लक्ष्मीची आरती करून कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रितपणे सुख-समृद्धीची प्रार्थना करतात. या दिवशी व्यापारी वर्गातही विशेष उत्साह असतो. दुकाने, कार्यालये, उद्योग आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये लक्ष्मीपूजन केले जाते. नवीन हिशेबवह्यांचे पूजन करून आगामी वर्षातील आर्थिक व्यवहारांना शुभारंभ केला जातो. व्यापारात प्रामाणिकपणा, प्रगती आणि भरभराट लाभावी, अशी प्रार्थना केली जाते.

लक्ष्मीपूजनाचा शुभ मुहूर्त

रविवार, ८ नोव्हेंबर २०२६

यंदा रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ रोजी दीपावली अमावस्येला लक्ष्मीपूजन केले जाणार आहे. पुण्यातील पंचांगानुसार लक्ष्मीपूजनासाठी संध्याकाळचा प्रदोषकाळ महत्त्वाचा मानला जातो.

लक्ष्मीपूजन
८ नोव्हेंबर २०२६
रविवार, दीपावली अमावस्या
सायं. ६:२४ ते ८:२४
पुण्यासाठी प्रचलित स्थिर वृषभ लग्नाचा पूजामुहूर्त

टीप : पंचांग व गणनापद्धतीनुसार मुहूर्तात काही मिनिटांचा फरक असू शकतो.

लक्ष्मीपूजनाचा खरा अर्थ केवळ धनप्राप्ती नव्हे!

आजच्या आधुनिक आणि स्पर्धात्मक युगात लक्ष्मीपूजनाचा अर्थ केवळ पैसा, संपत्ती किंवा भौतिक सुख एवढ्यापुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. खरी समृद्धी ही केवळ मोठे घर, वाहन, बँक बॅलन्स किंवा महागड्या वस्तूंमध्ये नसते. कुटुंबातील प्रेम, परस्पर विश्वास, उत्तम आरोग्य, समाधान, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांमध्येही खरी लक्ष्मी वसलेली असते. प्रामाणिक कष्टातून मिळविलेली संपत्ती, योग्य मार्गाने केलेला व्यवसाय, गरजूंच्या मदतीसाठी पुढे केलेला हात आणि समाजाच्या कल्याणासाठी केलेले कार्य हीदेखील लक्ष्मीचीच विविध रूपे आहेत. त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रत्येकाने आपल्या कष्टांचा सन्मान करण्याबरोबरच संपत्तीचा सदुपयोग करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

समाजातही समृद्धीचा प्रकाश पसरू दे!

दीपावलीचा दिवा केवळ आपल्या घरातील अंधार दूर करत नाही, तर तो आशा, विश्वास आणि सकारात्मकतेचा संदेश देतो. समाजातील गरीब, वंचित आणि गरजू घटकांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश पोहोचविणे हीदेखील आपली सामाजिक जबाबदारी आहे. सण साजरा करताना पर्यावरणाचे रक्षण, प्रदूषणमुक्त दीपावली आणि गरजू व्यक्तींना मदत यांसारख्या गोष्टींनाही महत्त्व दिले पाहिजे.

आज समाजाला केवळ आर्थिक संपन्नतेची नव्हे, तर विचारांची, संस्कारांची आणि माणुसकीचीही श्रीमंती आवश्यक आहे. जिथे प्रामाणिकपणा आहे, जिथे कष्टाला प्रतिष्ठा आहे, जिथे स्त्रीचा सन्मान आहे आणि जिथे गरजूंच्या मदतीसाठी माणुसकी जागी आहे, तिथेच खऱ्या अर्थाने लक्ष्मीचा वास असतो.

नव्या आशा, नवे संकल्प आणि समृद्ध भविष्य!

श्री लक्ष्मीपूजन हा आत्मपरीक्षणाचा आणि नव्या संकल्पांचा दिवसही आहे. आर्थिक नियोजन, बचतीची सवय, कष्ट करण्याची तयारी आणि प्रामाणिक व्यवहार यांचा अंगीकार करून प्रत्येकाने स्वतःच्या प्रगतीबरोबरच कुटुंबाच्या आणि समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे. देवी महालक्ष्मीच्या चरणी प्रार्थना करताना आपल्या जीवनात सद्बुद्धी, विवेक आणि समाधान नांदावे, हीच अपेक्षा ठेवावी.

दीपावलीच्या या मंगलमय पर्वावर देवी महालक्ष्मीची कृपा प्रत्येकाच्या घरावर राहो. प्रत्येक कुटुंबात सुख, शांती, आरोग्य, आनंद आणि समृद्धी नांदो. प्रत्येकाच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य आणि निराशेचा अंधकार दूर होऊन यश, प्रगती आणि समाधानाचा प्रकाश पसरू दे. चला, यंदाच्या लक्ष्मीपूजनाला केवळ धनाची पूजा न करता कष्ट, प्रामाणिकपणा, माणुसकी आणि सद्विचारांचीही पूजा करूया. हाच श्री लक्ष्मीपूजनाचा खरा संदेश!

सर्वांना श्री लक्ष्मीपूजन आणि दीपावलीच्या हार्दिक मंगलमय शुभेच्छा!

थोडक्यात पण महत्वाचे



आदिवासी-कातकरी वस्त्यांमध्ये दिवाळीचा आनंद

पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीचा आनंद समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भोर तालुक्यातील अतिदुर्गम अशा किल्ले रायरेश्वर परिसरातील टिटेघर, नाझरे व माकोशी येथील आदिवासी-कातकरी वस्त्यांमध्ये पुणे शहरातील गणेशोत्सव मंडळांच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमांतर्गत ५१ आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळ व आकाशकंदील भेट देण्यात आले. तसेच शैक्षणिक मदतीचा भाग म्हणून लहान विद्यार्थ्यांसाठी पाच सायकलींचे वाटप करण्यात आले. दिवाळी फराळ व सायकलींची भेट मिळाल्याने वस्तीवरील लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता. हा सामाजिक उपक्रम जय गणेश व्यासपीठ, पुणे शहर यांच्या अंतर्गत नवज्योत मित्र मंडळ, येरवडा; वीर शिवराज मंडळ, गुरुवार पेठ; संजीवनी मित्र मंडळ, सहकारनगर आणि साईनाथ मंडळ ट्रस्ट, बुधवार पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. दुर्गम भागातील कातकरी विद्यार्थ्यांपर्यंत सायकली पोहोचविण्यासाठी सागर गांधी व पीयूष शहा यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाचे आयोजन अमित जाधव, किरण सोनीवाल, प्रसाद दिवटे, निलेश कोंढापूरे, चैतन्य सिन्नरकर व अक्षय पानसरे यांनी केले होते. दिवाळीचा सण केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांसोबत आनंद वाटून साजरा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. नाझरे वस्ती वरील महिला अध्यक्षा मंगला वाघमारे यांनी पुण्यातील गणेशोत्सव कार्यकर्त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले आज तुमच्या मुळे आमची दिवाळी खऱ्या अर्थाने साजरी होणार आहे.



मीडिया रेजन्सीतील चिमुकल्यांनी साकारला शिवकालीन किल्ला!

- दिवाळीनिमित्त छोट्या मावळ्यांचा उपक्रम
- शिवरायांच्या इतिहासाचा वारसा जपण्याचा सुंदर प्रयत्न

नव्हे-मानाजीनगर (आरंभ पर्व) : दीपावलीनिमित्त मीडिया रेजन्सी सोसायटी, मानाजीनगर येथील चिमुकल्यांनी दगड-मातीच्या साहाय्याने आकर्षक शिवकालीन किल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे. श्लोक घोलप, सोहम गोबाडे, संस्कार हिंदोळे, पृथ्वी पाटील, अंश कोतकर, उत्कर्ष गुंड, देवांश कोतकर आणि प्रणव गोबाडे या बालमावळ्यांनी एकत्र येत स्वतःच्या कल्पकतेतून हा किल्ला उभारला. विशेष म्हणजे, अवकाळी पावसामुळे किल्ला खराब झाला तरी निराश न होता ही मुले पुन्हा नव्या उत्साहाने किल्ला तयार करतात. त्यांची ही जिद्द आणि शिवरायांच्या इतिहासाविषयीची ओढ कौतुकास्पद आहे. आजच्या मोबाईलच्या युगात मुलांनी मातीशी नाते जोडत गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा जपणे ही आनंदाची बाब आहे. या उपक्रमातून मैत्री, कल्पकता आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचा अभिमान जागृत होत आहे.

अजितदादांच्या स्मृतींना उजाळा देणारा अनोखा दीपोत्सव

माळेगाव (आरंभ पर्व) : लोकनेते अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी यंदाच्या दिवाळीत माळेगाव बुद्रुक (ता.बारामती) येथे अनोखा स्मृतिउपक्रम राबविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात ॲड. राहुल तावरे मित्र परिवाराच्या वतीने अजितदादांची प्रतिमा असलेला भव्य आकाशकंदील उभारण्यात आला. आज या आकाशकंदिलाचे पूजन युवा नेते जय पवार यांच्या हस्ते भावपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी 'एकच वादा... अजितदादा!' आणि 'अजितदादा अमर रहे!' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यंदाची दिवाळी अजितदादांच्या अनुपस्थितीत साजरी होत असल्याने कार्यकर्ते आणि चाहत्यांमध्ये भावनिक वातावरण होते. अशा परिस्थितीत त्यांच्या प्रतिमेचा आकाशकंदील उभारून त्यांच्या आठवणींचा प्रकाश माळेगावकरांच्या मनात कायम ठेवण्याचा प्रयत्न तावरे मित्र परिवाराने केला.

शिस्तबद्ध आणि दीर्घकालीन गुंतवणुकीवर भर द्या!

मुंबई (दै. आरंभ पर्व)

दिवाळी आणि नवीन संवत २०८३ च्या प्रारंभानिमित्त कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक व नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर उदय कोटक आणि कोटक निओचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाल शाह यांनी भारतीय अर्थव्यवस्था, शेअर बाजारातील सद्यस्थिती आणि आगामी वर्षातील गुंतवणुकीच्या संधींबाबत आपले विचार व्यक्त केले. गुंतवणूकदारांनी बाजारातील अल्पकालीन चढ-उतारांपेक्षा दीर्घकालीन दृष्टिकोन, शिस्तबद्ध गुंतवणूक आणि जोखीम व्यवस्थापनाला प्राधान्य द्यावे, असा महत्त्वपूर्ण सल्ला त्यांनी दिला. उदय कोटक यांनी जागतिक राजकीय तणाव, आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून (FII) मोठ्या प्रमाणात झालेली गुंतवणुकीची विक्री या पार्श्वभूमीवर भारतीय गुंतवणूकदारांनी दाखवलेल्या



- उदय कोटक आणि श्रीपाल शाह यांचा गुंतवणूकदारांना सल्ला
- बाजारातील संधींचा लाभ घेण्यासाठी विविधतेसह गुंतवणूक करण्याचे आवाहन

विश्वासाचे आणि संयमाचे कौतुक केले. अलीकडील बाजारातील घसरणीमुळे भारतीय कंपन्यांच्या शेअर्सचे मूल्यांकन अधिक आकर्षक आणि योग्य पातळीवर आले असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे आगामी काळात गुंतवणुकीच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले.

धायरीच्या वाहतूक कोंडीवर दिलासा

कालव्यावरील पूल अन् डीपी रस्त्याला मंजुरी : आ. भीमराव तापकीर यांच्या पाठपुराव्याला यश

- लोकमत प्रेस ते सावित्री गार्डनदरम्यान पूल उभारण्याचा मार्ग मोकळा
- नारायण सणस शाळा ते बारांगणी मळा रस्त्याचाही प्रस्ताव मंजूर



पुणे (दै. आरंभ पर्व)

धायरी आणि वडगाव परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या दोन महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांना अखेर मंजुरी मिळाली आहे. लोकमत प्रेस ते सावित्री गार्डनदरम्यान कालव्यावर पूल उभारणे आणि नारायण सणस शाळा ते बारांगणी मळा या ९ मीटर रुंदीच्या डीपी रस्त्यासाठी जलसंपदा विभागाची जागा वापरण्याच्या प्रस्तावाला नियामक मंडळाने मान्यता दिली. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला. धायरी परिसराचा विस्तार झपाट्याने होत असताना मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत पर्यायी रस्ते उपलब्ध व्हावेत, अशी स्थानिकांची मागणी होती. या पार्श्वभूमीवर मिळालेली मंजुरी महत्त्वाची ठरणार आहे. या दोन्ही कामांसाठी आमदार भीमराव तापकीर यांनी जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता. ७ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांनी यासंदर्भात पत्र देऊन आवश्यक परवानगीची मागणी केली होती. स्थानिक नगरसेवक हरिदास चरवड आणि राजाभाऊ लायगुडे यांनीही संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी प्रयत्न केले. स्थानिक नगरसेविका कोमल नवले, जयश्री भूमकर यांनीही यासाठी प्रयत्न केले. जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रवीण कोल्हे, उपअभियंता सचिन गाडे आणि पुणे महापालिकेचे कार्यकारी अभियंता सुरेश संखे यांनी ह्या प्रस्तावासाठी यशस्वी पाठपुरावा केला. मंजुरी मिळाल्याने आता या दोन्ही कामांच्या पुढील प्रशासकीय आणि तांत्रिक प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रत्यक्ष पूल आणि रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर धायरी मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा भार कमी होण्यास मदत होईल. मात्र, नागरिकांना या पर्यायी मार्गांचा लाभ मिळण्यासाठी प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होते आणि ते कधी पूर्ण होते, याकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.





नव्या स्ट्रीटलाइट सुविधेने परिसर होणार प्रकाशमान!

पुणे (दै. आरंभ पर्व)

नवले ब्रीज परिसरातील सन युनिव्हर्स सोसायटी आता नव्या प्रकाशाने उजळणार आहे. सोसायटी परिसरातील नागरिकांची गरज लक्षात घेऊन नगरसेविका सौ. कोमल सारंग नवले यांच्या विशेष प्रयत्नांतून नव्याने उभारण्यात आलेल्या स्ट्रीटलाइट सुविधेचे उद्घाटन आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. रात्रीच्या वेळी परिसरात

- सन युनिव्हर्स सोसायटीचा अंधार दूर
- नगरसेविका कोमल सारंग नवले यांच्या प्रयत्नांना यश
- आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते सुविधेचे उद्घाटन

पुरेसा प्रकाश नसल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन नगरसेविका कोमल नवले यांनी पुढाकार घेत स्ट्रीटलाइट सुविधेसाठी प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे आता सोसायटी परिसरात प्रकाशाची व्यवस्था उपलब्ध होणार असून, नागरिकांची गैरसोय दूर होण्यासोबतच रात्रीच्या सुरक्षिततेलाही बळ मिळणार आहे. स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लागल्याने सोसायटीतील रहिवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. या उद्घाटनप्रसंगी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका जयश्री भूमकर, नगरसेविका कोमल नवले, मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, नाना नवले, सारंग नवले, तुषार पोकळे, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे, सामाजिक कार्यकर्ते रमेश गायकवाड, वसंत देशमुख यांच्यासह सोसायटीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'राइज अँड फॉल'च्या दुसऱ्या सीझनचा विजेता शहजाद पूनावाला!

मुंबई (दै. आरंभ पर्व)



अनपेक्षित वळणे, राजकीय डावपेच, मैत्री, संघर्ष आणि सत्तासंघर्षाने रंगलेल्या 'राइज अँड फॉल' या एमएक्स ओरिजिनलच्या दुसऱ्या सीझनचा ग्रँड फिनाले अखेर उत्साहात पार पडला. या सीझनचे विजेतेपद शहजाद पूनावाला याने पटकावले असून, त्याला मानाची विजेतेपदाची ट्रॉफी आणि ३५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. प्रियांका चहर चौधरी प्रथम उपविजेती, तर गौतम गुलाटी द्वितीय उपविजेता ठरला. बनिजय एशियाची निर्मिती असलेल्या या रिॲलिटी शोचे सूत्रसंचालन माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग याने केले. या स्पर्धेत १५ सेलिब्रिटी स्पर्धक सहभागी झाले होते. टॉवरमधील सत्ता, डावपेच, बदलती समीकरणे आणि कठीण आव्हानांचा सामना करत स्पर्धकांनी अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. प्रत्येक टप्प्यावर बदलणारी परिस्थिती आणि अनपेक्षित निर्णयांमुळे प्रेक्षकांची उत्सुकता शेवटपर्यंत कायम राहिली. या शोची संकल्पना पेंटहाऊस आणि बेसमेंट अशा दोन वेगवेगळ्या स्तरांवर आधारित होती. 'रूलर्स'ना आपले सर्वोच्च स्थान टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागत होते, तर 'वर्कर्स'ना सत्तेच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचण्याची संधी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. दोन वेळा झालेल्या 'तख्तापलट'मुळे संपूर्ण खेळाची समीकरणे बदलली. अनपेक्षित युती, वैयक्तिक मतभेद आणि स्पर्धकांनी आखलेले डावपेच यामुळे प्रत्येक भाग अधिक रंगतदार ठरला.

एका छोट्याशा मदतीतून वेदिकाच्या स्वप्नांना मिळाले नवे बळ!

आशीर्वाद वृद्धाश्रमाकडून हार्मोनियम भेट; निरंकारी मंडळाच्या सेवादलाकडून ज्येष्ठांना दिवाळी फराळाचे वाटप



वेदिकाच्या स्वप्नांना मिळालेला आधार आणि ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद, या दोन्ही उपक्रमांतून सामाजिक बांधिलकीचे सुंदर दर्शन घडले. मदतीचा हात पुढे करण्यासाठी मोठ्या गोष्टींची गरज नसते, तर केवळ संवेदनशील मनाची आवश्यकता असते, हाच संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

- मिलिंद दीक्षित, नांदेड सिटी,

नांदेड सिटी (दै. आरंभ पर्व)

समाजात आजही माणुसकी जिवंत असल्याचा प्रत्यय नांदेड सिटी येथे आला. एका छोट्याशा मदतीतून एका चिमुकलीच्या कलेला आणि स्वप्नांना नवे बळ मिळाले. येथील आशीर्वाद वृद्धाश्रमाचे श्री. विकास देडगे यांनी वापरात नसलेले हार्मोनियम कु. वेदिका ओमप्रकाश शिंदे हिला भेट देत तिच्या संगीतप्रवासाला हातभार लावला. नांदेड सिटीकरांना करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत विकास देडगे यांनी हे हार्मोनियम देण्याचा पुढाकार घेतला. एका छोटेखानी कार्यक्रमात वेदिकाला हार्मोनियम सुपूर्द करण्यात आले. यावेळी तिचे वडील ओमप्रकाश शिंदे उपस्थित होते. मुलीच्या कलेला आणि स्वप्नांना समाजाकडून मिळालेला आधार पाहून त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. एखाद्याच्या घरात अडगळीत पडलेली वस्तू दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा नवा सूर निर्माण करू शकते, याचे हे भावस्पर्शी उदाहरण ठरले. या कार्यक्रमाला संत निरंकारी मंडळाच्या दत्तनगर शाखेतील सेवादलाचे संकेत बांदल, वैशाली बांदल, वंदना जगताप, नंदा कांबळे, संपत कांबळे व सारिका निकम उपस्थित होते. तसेच नांदेड सिटी येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अरविंद कुलकर्णी आणि सतीश पाटील यांचीही उपस्थिती होती. दरम्यान, या कार्यक्रमाचे औचित्य साधून संत निरंकारी मंडळ, दत्तनगर शाखेच्या सेवादलाच्या वतीने आशीर्वाद वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना दिवाळी फराळासह आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



पहिले संविधान सन्मान महिला साहित्य संमेलन २६ नोव्हेंबरला पुण्यात


- ॲड. प्रार्थना सदावर्ते संमेलनाध्यक्ष
- लडकत दाम्पत्यास 'सावित्रीज्योती', तर वानखेडे दांपत्यास 'रमाई भीमराव' पुरस्कार जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : विश्वबंधुता साहित्य परिषद आणि सहयोगी संस्थांच्या वतीने संविधान दिनाच्या (२६ नोव्हेंबर २०२६) निमित्ताने पहिले संविधान सन्मान महिला साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या निमित्ताने दिला जाणारा 'सावित्रीज्योती' पुरस्कार सत्यशोधक सनदी अधिकारी नानासाहेब व सुनीता लडकत यांना, तर 'रमाई भीमराव' पुरस्कार साहित्यिक प्रा. चंद्रकांत व पौर्णिमा वानखेडे यांना जाहीर झाला आहे. विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांच्या हस्ते या पुरस्करांचे वितरण होईल, अशी माहिती सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी दिली. संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिका ॲड. प्रार्थना सदावर्ते या भूषवत असून, संमेलनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात होणार आहे. याप्रसंगी स्वागताध्यक्ष मंदाकिनी रोकडे, कार्याध्यक्ष प्रा. सायली गोसावी, कार्यवाह संगिता झिंजुरके, यांची उपस्थिती राहिल. पत्रकार शबनम सय्यद आणि सायली जोशी यांचा 'संविधान सन्मान पत्रकारिता पुरस्कार' देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रात लातूर येथील प्रिया माळी यांच्या अध्यक्षतेखाली काव्यसंमेलन होईल. यामध्ये महाराष्ट्रातील ३० नामवंत कवियीत्री सहभागी होणार आहेत. यावेळी काव्यप्रतिभा तसेच प्रज्ञावंत साहित्यिक पुरस्कार प्रदान करण्यात येतील. डॉ. सविता पाटील, सुलभा निवंगुणे, प्रा. भारती जाधव, डॉ. बंडोपंत कांबळे आणि प्रा. प्रशांत रोकडे संमेलनाचे काम पाहत आहेत.



सोरतापवाडीत 'पारंबी कलादालन' दिवाळी प्रदर्शनाचे दिमाखात उद्घाटन

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : सोरतापवाडी येथे महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देणाऱ्या 'पारंबी कलादालन' दिवाळी प्रदर्शनाचे उद्घाटन शिरूर-हवेलीचे आमदार माऊली आबा कटके यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी जेष्ठ नेते बाळासाहेब चोरगे, पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, उपसभापती विद्या गायकवाड, पंचायत समितीचे गटनेते सुदर्शन चौधरी, पंचायत समिती सदस्य मनोज काळभोर, कोमल कांबळे, उपसभापती नानासाहेब आबनावे, माजी उपसभापती तानाजी चौधरी, शंकर कड, प्रियांका चौधरी, संधि चौधरी, गणेश चौधरी, यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर गावातील उपस्थित होते. या प्रदर्शनात तब्बल १०० स्टॉल्सच्या माध्यमातून महिला उद्योजिकांनी आपली विविध उत्पादने, आकर्षक वस्तू आणि कलाकुसरीचे नमुने सादर केले आहेत. महिलांच्या कष्टांना बाजारपेठ मिळवून देणारा, त्यांच्या व्यवसायाला चालना देणारा आणि स्वप्नांना नवी दिशा देणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरत आहे. महिलांना केवळ प्रोत्साहन देणे पुरेसे नसून त्यांच्या कर्तृत्वाला योग्य संधी आणि उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महिला उद्योजिकांना आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या सुंदर उपक्रमाचे आयोजन शितल चौधरी व पारंबी कलादालनाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या दिवाळीत स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांची खरेदी करून त्यांच्या कष्टांना आणि कर्तृत्वाला प्रोत्साहन देऊया. महिला उद्योजिकांना साथ देत आत्मनिर्भर आणि स्वावलंबी समाज घडवूया असं मतं आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.



दुष्काळावर मात करण्यासाठी लोकसहभागाची ताकद उभी करू

आमदार बाबाजी काळे



राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि भविष्यातील पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही. आपणही समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून प्रत्येकाने जलसंधारणाच्या कामात योगदान दिले पाहिजे. पावसाचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत जिरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि शेतीला शाश्वत पाण्याचा स्रोत उपलब्ध करून देणे, हे आपले सामूहिक उद्दिष्ट असले पाहिजे. असे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी येथे केले.

जलतारा प्रबोधन कार्यशाळा व प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर जलतारा प्रकल्पाचे संशोधक डॉ. पुरुषोत्तम वायाळ, तहसीलदार प्रशांत बेडसे, जिल्हा परिषदेचे गटनेते विजयसिंह शिंदे, जिल्हा परिषद सदस्य गणेश आरगडे, तनुजा घनवट, दीप्ती भोगाडे, माजी सभापती विद्या मोहिते, माजी उपसभापती मंगेश सावंत, हिरामण सातकर, बाजार समितीचे सभापती अशोक राक्षे, माजी उपसभापती मंगेश सावंत, पंचायत समिती सदस्य सारिका गोगावले, कविता राक्षे, सेनेचे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे,पाणी पुरवठा विभागाचे अभियंता कालिका खरात, छोटे पाटबंधारे रुपाली तांदळे, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले उपस्थित होते. या कार्यशाळेला अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, ग्रामस्तरीय कर्मचारी आणि शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पुढे बोलताना आमदार काळे म्हणाले, जलतारा उपक्रम केवळ एक कार्यशाळा किंवा शासकीय योजना म्हणून मर्यादित राहू नये, तर तो लोकसहभागातून उभा राहणारा व्यापक जनआंदोलनाचा विषय बनला पाहिजे. यासाठी जिल्हा परिषद गट, गण आणि गावनिहाय नियोजन करण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजनांसोबतच लोकसहभाग आणि आमदार बाबाजी काळे सोशल फाउंडेशनच्या माध्यमातूनही जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येतील.

डॉ. वायाळ यांनी जलतारा प्रणालीचे तांत्रिक स्वरूप, पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची पद्धत, भूजल पुनर्भरण आणि शेतकऱ्यांना होणारे दीर्घकालीन फायदे याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी तहसीलदार प्रशांत बेडसे, सभापती गौरी मून्हे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांनी केले. आभार उपसभापती दिलीप डुबे यांनी मानले. सभापती गौरीताई मून्हे, उपसभापती दिलीप डुबे, पंचायत समिती खेड, कृषी उत्पन्न बाजार समिती, खेड खरेदी-विक्री संघ, जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद पुणे आणि शेतकरी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सहकारात कर्तृत्व, समाजकार्यात माणुसकी

परीघाताई आरोटे यांचा प्रेरणादायी प्रवास!



(दै. आरंभ पर्व)

काही माणसे पदामुळे मोठी होतात, काही संपत्तीमुळे नावारूपाला येतात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे आपल्या विचारांनी, कृतीने आणि माणुसकीच्या जिव्हाळ्याने लोकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करतात. स्वतःच्या आनंदापेक्षा समाजाचे दुःख मोठे मानणारी, सत्तेच्या समीकरणांपेक्षा शब्दाला अधिक महत्त्व देणारी आणि पदापेक्षा सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देणारी अशीच एक कर्तृत्ववान व्यक्ती म्हणजे सौ. परीघाताई विश्वासराव आरोटे!

सामाजिक कार्याची तळमळ, सहकार क्षेत्रातील सक्रियता, महिला सक्षमीकरणाचा ध्यास, माणसांशी जपलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि मनाचा मोठेपणा या गुणांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहायला मिळतो. ६ नोव्हेंबर हा त्यांचा वाढदिवस. मात्र, यंदा दुष्काळाची गंभीर परिस्थिती, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि सर्वसामान्य जनतेच्या वेदना लक्षात घेऊन त्यांनी वाढदिवसाचा कोणताही सोहळा साजरा न करण्याचा निर्णय घेतला. आजच्या दिखाऊपणाच्या आणि वाढदिवसाच्या भव्य सोहळ्यांच्या जमान्यात स्वतःचा आनंद बाजूला ठेवून समाजाच्या दुःखाशी एकरूप होण्याची त्यांची ही भूमिका निश्चितच कौतुकास्पद आहे. कारण समाजसेवा ही केवळ व्यासपीठावरून भाषण करण्याची गोष्ट नसते, तर ती आपल्या कृतीतून सिद्ध करावी लागते, हेच त्यांनी दाखवून दिले.

शब्दाला जागणारे व्यक्तिमत्त्व; राजकारणातही जपला विश्वासाचा धर्म!

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परीघाताईंच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू समोर आला. निवडणुकीच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील समीकरणांमध्ये माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी त्यांना निवडणुकीतून माघार घेण्याची विनंती केली. या विनंतीमागील विश्वास आणि दिलेल्या शब्दाचा मान राखत त्यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला.

आजच्या राजकारणात अनेकदा शब्द दिले जातात, आश्वासने दिली जातात; मात्र ती पाळणारे किती, हा प्रश्न उपस्थित होतो. अशा परिस्थितीत स्वतःची भूमिका आणि निवडणुकीतील संधी बाजूला ठेवून दुसऱ्याच्या शब्दाला मान देणे, ही बाब निश्चितच त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष देणारी आहे. निवडणुकीत विजय मिळवणे हेच कर्तृत्व नसते, तर योग्य वेळी विश्वास जपणे आणि संबंधांची प्रतिष्ठा राखणे हेही मोठेपणाचे लक्षण असते, याची प्रचिती त्यांच्या निर्णयातून आली.

या निर्णयानंतर सुजय विखे पाटील यांनी अकोले तालुक्यातील दैनिक समर्थ गांवकरीच्या कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन परीघाताईंचे आभार मानले. यावेळी आरोटे कुटुंबीय आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या भेटीने परस्पर विश्वास, सन्मान आणि सामाजिक संबंधांमधील जिव्हाळ्याचे दर्शन घडविले.

सहकार क्षेत्रात केवळ पदे नाहीत, तर कार्याचा ठसा!

परीघाताई आरोटे यांची ओळख केवळ एका प्रतिष्ठित कुटुंबातील गृहिणी म्हणून मर्यादित नाही. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सहकार क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका, चितळवेढे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या संचालिका, मुक्ताई मजूर सहकारी संस्थेच्या अध्यक्षा तसेच दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या संचालिका म्हणून त्या जबाबदारी सांभाळत आहेत.



विविध संस्थांमधील त्यांचा सहभाग हा केवळ पदापुरता मर्यादित नसून संस्थात्मक कामकाज, महिलांचा सहभाग, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक संघटन यांना बळ देणारा आहे. सहकार म्हणजे केवळ आर्थिक व्यवहारांचे गणित नव्हे, तर परस्पर विश्वास, एकजूट आणि सामूहिक विकासाची चळवळ आहे, ही भावना त्यांच्या कार्यातून अधोरेखित होते.

विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सहकार क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावू शकते. महिलांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत, आर्थिक व्यवहारांची जाण निर्माण करावी आणि समाजाच्या विकासप्रक्रियेत सक्रिय सहभागी व्हावे, हा विचार त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

पत्रकारांची माय माऊली; आरोटे कुटुंबाचा भक्कम आधार!

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या त्या सुविद्य पत्नी आहेत. डॉ. आरोटे यांनी पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि संघटनात्मक क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. या प्रवासात परीघाताईंची साथ, समजूतदारपणा आणि खंबीर पाठबळ महत्त्वाचे ठरले आहे.

पत्रकारिता म्हणजे समाजातील प्रश्नांना वाचा फोडणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि सामान्य माणसाच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवणे. हे कार्य करताना पत्रकारांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा वेळी कुटुंबाचा आधार अत्यंत महत्त्वाचा असतो. डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सामाजिक आणि पत्रकारितेच्या वाटचालीत परीघाताईंचे योगदान याच अर्थाने मोलाचे आहे.

दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या माध्यमातूनही त्या सक्रिय आहेत. पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले आहेत. त्यामुळेच अनेकांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी आणि आदराची भावना आहे. पत्रकारांच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या आणि प्रत्येकाशी मायेने संवाद साधणाऱ्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांना 'पत्रकारांची माय माऊली' असे संबोधणे सार्थ ठरते.

पुरस्काराने कार्याचा गौरव; समाजसेवेचा प्रवास अधिक प्रेरणादायी!

सामाजिक, सहकार आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना 'आरंभ पर्व नवदुर्गा पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या कार्याची पावती असून, समाजासाठी सातत्याने काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा सन्मान आहे.

खरे तर पुरस्कार मिळणे ही आनंदाची बाब असली, तरी समाजाच्या मनात स्थान निर्माण करणे हा त्याहून मोठा पुरस्कार असतो. परीघाताईंनी आपल्या स्वभावाने, कार्याने आणि माणुसकीच्या नात्याने हा सन्मान मिळवला आहे.

वाढदिवसाचा गाजावाजा नाही; समाजाच्या वेदनांशी नाते!

आज वाढदिवस म्हटले की मोठे बॅनर, जाहिराती, पुष्पगुच्छ, सत्कार समारंभ आणि सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव असे चित्र सर्वत्र दिसते. मात्र, दुष्काळाच्या सावटाखाली जगणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन स्वतःचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय परीघाताईंनी घेतला. हा निर्णय केवळ औपचारिक नसून सामाजिक संवेदनशीलतेचा प्रत्यय देणारा आहे.



एका बाजूला स्वतःच्या आनंदावर संयम ठेवण्याची भूमिका, दुसऱ्या बाजूला सहकार क्षेत्रातील जबाबदाऱ्या आणि तिसऱ्या बाजूला पत्रकारिता व सामाजिक कार्यात कुटुंबाला दिलेली साथ, या सर्व गोष्टी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळी उंची देतात.

समाजात मोठेपणा हा पैशाने, पदाने किंवा प्रसिद्धीने मोजला जात नाही; तर तो माणसांच्या मनात निर्माण केलेल्या विश्वासाने मोजला जातो. परीघाताईंच्या वाटचालीतून हाच संदेश मिळतो.

समाजासाठी जगणारी माणसे स्वतःचा गौरव शोधत नाहीत; त्यांच्या कार्यातूनच समाज त्यांचा गौरव करत असतो!

६ नोव्हेंबर रोजी झालेल्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा लाभो. त्यांच्या हातून सहकार, महिला सक्षमीकरण आणि समाजहिताचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

सौ. परीघाताई विश्वासराव आरोटे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! आपली माणुसकी अशीच जपली जावो, समाजसेवेचा हा दीप असाच तेवत राहो आणि आपल्या कार्याचा सुगंध अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण करत राहो!

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ

सामाजिक बांधिलकी, सहकार आणि कर्तृत्वाचा अनोखा संगम !



सौ. परीघाताई विश्वासराव आरोटे

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

मा. प्रतिक गंगणे,
व्यवस्थापकीय संपादक दै. आरंभ पर्व

सामाजिक बांधिलकी, सहकार आणि कर्तृत्वाचा अनोखा संगम !



सौ. परीघाताई विश्वासराव आरोटे

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

मा. लक्ष्मण साबळे,
निवासी संपादक दै. आरंभ पर्व

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.